स्टेट बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज् (एम्. एस्. पटेल) को - ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., मुंबई.
(रजि. नं. ६५२७/२१)
स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई मुख्य शाखा बिल्डींग, तिसरा मजला, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
वेब-साईट : www.sbimspatel.com ● ई-मेल : info@sbimspatel.com ● दूरध्वनी : २२६६ ४३६०, २२६६१७८०

संदर्भ क्र. : परिपत्रक क्र.२०२५-२०२६/२ दिनांक : १५ जानेवारी २०२६

**सभासद बंधु-भगिनींनो,**

**दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत खालील महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.**

**<u>विश्रांतीगृहे (Holiday Homes)</u>**

सोसायटीच्या वतीने मालवण, मडगाव (गोवा), महाबळेश्वर, आवास (अलिबाग), पुणे, नेरुळ (नवी मुंबई), वडाळा (मुंबई) आणि नाशिक येथे सभासदांसाठी अल्पदरात विश्रांतीगृहे चालवण्यात येत आहेत. गेल्या तीन चार वर्षांत विश्रांतीगृहांवरील खर्चात विविध कारणांनी भरीव वाढ झाली आहे. नगरपालिकेच्या करामध्ये झालेल्या वाढीबरोबरच पाणी, वीज आणि देखभालीवरील खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच भाडेतत्वावरील विश्रांतीगृहांच्या भाड्यात सुद्धा वाढ झाली आहे.

सोसायटीला सभासदांकडून विश्रांतीगृहांमध्ये टॉवेल, साबण यासारख्या सुविधा द्याव्यात, यासाठी सूचना येत होत्या. त्या सूचनांबाबत सकारात्मक विचार करून संचालक मंडळाने महाबळेश्वर व आवास (अलिबाग) येथील भाडेतत्त्वावरील विश्रांतीगृहांमध्ये टॉवेल, साबण यासारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याप्रमाणे सोसायटीच्या इतर विश्रांतीगृहांमध्ये टॉवेल, बॉडी वॉश व शॅम्पू या सुविधा सुरू करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे.

दि.१० जानेवारी २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत या दोन्ही बाबींबाबत चर्चा झाली. त्यावेळी महाबळेश्वर व आवास (अलिबाग) येथील भाडेतत्वावरील विश्रांतीगृहांच्या शुल्कात सर्व वर्गांसाठी रु.१००/- ने व इतर विश्रांतीगृहांच्या शुल्कात सर्व वर्गांसाठी रु.२००/- ने नाममात्र वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही भाडेवाढ दि.०१ फेब्रुवारी २०२६ पासून सर्व विश्रांतीगृहांसाठी अमलात येईल. सर्व विश्रांतीगृहांसाठीचे सुधारित शुल्क पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| चतुर्थश्रेणी वर्गासाठी | रुपये ५०० प्रतिदिन |
| लिपिक वर्गासाठी | रुपये ६०० प्रतिदिन |
| अधिकारी वर्गासाठी | रुपये ७०० प्रतिदिन |

आपला नम्र,

**महेंद्र वैद्य**
मानद्-सचिव